## प्रकरण ५ वे

# नीलम माणगावे यांच्या सामाजिक कादंबऱ्यांची वैशिष्ट्ये

इतर सामाजिक कादंबरीकार व नीलम माणगांवे

वाचकांच्या प्रतिक्रिया

नीलम माणगावे यांचे मराठी कादंबरीतील स्थान

पुरूषप्रधान संस्कृती

स्त्रियांचे शोषण

माणुसकीचा ऱ्हास

वेश्यांना व गृहिणींना दिली जाणारी वागणूक

स्त्रियांच्या समस्या

समारोप

## प्रकरण ५ वे

## 'नीलम माणगावे यांच्या सामाजिक कादंबऱ्यांची वैशिष्ट्ये'

### प्रास्ताविक

नीलम माणगावे यांनी कथा, कविता, आत्मकथन इ, साहित्याप्रमाणे कादंबरीलेखन केलले आहे. त्यांच्या लेखनातून प्रौढकुमारिका, विधवांचे दु:ख, विवाहित स्त्रीच्या व्यथा, वेदना, बालगुन्हेगारीचा प्रश्न इ. समस्या मांडलेल्या आहेत.

तसेच 'शोध' कांदबरीत वेश्यांच्या जीवनचित्रणाबरोबरच विवाहित स्त्रियांच्या जीवनाचा वेधही घेतलेला दिसतो. 'मृत्युदंड' कादंबरीतून जैन समाजातील विमलाबाईंचे धार्मिक जीवन, पुरूषप्रधान संस्कृतीमुळे त्यांना भोगावे लागणारे दु:ख याचे चित्रण आलेले आहे. लेखिकेला स्त्रियांच्या अंगी असणाऱ्या गुणांचा विचार करणे, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे, स्त्रीत्वाची जाणीव होणे याचा विचार महत्त्वाचा वाटतो. त्यांनी पुरूषप्रधान समाजव्यवस्था, स्त्रियांचे शोषण, समाजातील स्त्रियांचे स्थान इ. विषयीचे आपले विचार मांडलेले दिसतात. त्यांच्या लेखनात गुणांबरोबर काही दोषही जाणवतात.

### इतर सामाजिक कादंबरीकार व नीलम माणगावे

१८५७ साली बाबा पद्मनजी यांनी यमुनापर्यटन ही सामाजिक कादंबरी लिहिली. त्यातून त्यांनी विधवा स्त्रियांचे दु:ख चित्रित केलेले दिसते. ''विधवांच्या करूण हालअपेष्टांसंबधी, सामाजिकतेतून निर्भयपणे चव्हाट्यावर मांडलेला दाहक अनुभव हे यमुनापर्यटनचे वैशिष्ट्य होय.''[१] गंभीरवृत्तीने सामाजिक जीवनाचा वेध घेणारे ह. ना. आपटे यांनी 'मी', 'पण लक्षात कोण घेतो', 'गणपतराव' इ. सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या. त्यांनी आपल्या कादंबऱ्यांतून विधवांचे दु:ख, स्त्री-शिक्षण, स्त्री-स्वातंत्र्य, स्त्री-समस्या चित्रित केल्या आहेत. ''कोणत्याही प्रश्नाकडे सुटेपणाने न बघता सामाजिक व्यवस्थेच्या संदर्भात बघावे लागते ही जाणीव 'मी', 'कर्मयोग' इ. मधील चर्चेने निर्माण केली तसेच कुटुंबातील छोटे-छोटे संघर्ष आणि वैयक्तिक स्वरूपाच्या सुधारणांकडून व्यापक सामाजिक प्रश्नांकडे मराठी कादंबरीचा प्रवाह वळवला.''[२]

श्री. व्य. केतकर यांनी आपल्या 'ब्राह्मणकन्या', 'विचक्षणा' इ. कादंबऱ्यांतून समाजातील पुनरूढ, कानीन, अक्करमाशा संततीचे भवितव्य, पुनर्विवाहाचे योग्ययोग्यत्व, प्रणयविवाह, परजातीतील विवाह इ. अनेक विषय मांडलेले दिसतात. तसेच नाथमाधव, वि. वा. हडप, बा. सं. गडकरी, पु. य. देशपांडे इ. नी देखील समाजवास्तव चित्रित करणाऱ्या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. १९६० नंतर मराठी कादंबरीत मध्यमवर्गीय जीवनाबरोबरच आदिवासी, भटक्या समाजाचे, दलित, ग्रामीण, मुस्लिम समाजाचे वास्तवचित्रण करण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. राजन गवस यांनी 'चौंडक', 'भंडारभोग' या कादंबऱ्यातून देवदासीचे दु:ख चित्रित केले आहे. आनंद यादव यांच्या 'झोंबी' या आत्मचरित्रात्मक कादंबरीतदेखील देवदासीचे जीवनचित्रण आलेले दिसते. बा. भ. बोरकर यांची भावीण ही कादंबरीदेखील अशाच आशयाची आहे. मधुकर वाकोडे (झेलझपाट), बाबा भांड (तंट्या), योगीराज वाघमारे (धुराळ), शेषराव मोहिते (धुळपेरणी), बाबाराव मुसळे (वारूळ) इत्यादी लेखकांनी सामाजिक कादंबऱ्या लिहीलेल्या आहेत.

स्त्री-लेखिकांमध्ये काशीबाई कानेटकरांनी 'रंगराव' ही सामाजिक कादंबरी लिहिली. विभावरी शिरूरकरांनी बळी या कादंबरीतून मांग-गारूडी या समाजाच्या व्यथा, वेदना चित्रित केलेल्या आहेत. ''केतकर, रघुवीर सामंत, दीघे, शिरूरकर, यांच्यामुळे मराठी कादंबरी मध्यमवर्गीय जीवनकक्षेच्या बाहेर पडली. तिचा आस वास्तव चित्रणाकडे झुकला तरीही या काळातील मराठी कादंबरी प्राधान्याने मध्यमवर्गीय आणि करमणूकप्रधान अशीच राहिली हे सत्य नाकारता येणार नाही.''[३] विभावरी शिरूरकर (जाई, शबरी, उमा), ज्योत्स्ना देवधर (घरगंगेच्या काठी, कल्याणी, पडझड) इंद्रायणी सावकार (सती), मालतीबाई दांडेकर (भिंगरी), आशा बगे (भूमी), सानिया (आवर्तन), शांता गोखले (रिटा वेलीणकर), कविता महाजन इत्यादी लेखिकांनी सामाजिक कादंबऱ्या लिहीलेल्या आहेत.

गौरी देशपांडे, अंबिका सरकार, शांता गोखले, ज्योत्स्ना देवधर, आशा बगे, सानिया इ. लेखिकांनी आपल्या कादंबऱ्यात मध्यमवर्गीय, उच्च मध्यमवर्गीय स्त्रीच्या भावविश्वातील गुंतागुंत चित्रित केलेली आहे.

नीलम माणगावे यांनी स्त्रीला केंद्रभूत ठेवून शोध, मृत्युदंड या सामाजिक कादंबऱ्या लिहीलेल्या आहेत. त्यांच्या कादंबऱ्यातील स्त्रिया या पारंपरिक पध्दतीचे जीवन जगताना परंपरेला छेद देण्याचा प्रयत्न करताना दिसतात. शोध कादंबरीतील कविता व मृत्यूदंड कादंबरीतील विमलाबाई या दोघीही गृहिणी आहेत. त्या घरसंसार, नवरा, मुलं बाळ याच परिघात वावरताना दिसतात. हरिभाऊंच्या काळातील स्त्री माजघरातून बाहेर पडून समाजात धीटपणे वावरताना दिसत नाही. नंतरच्या काळात स्त्रीवरील ही बंधने, मर्यादा हळूहळू कमी होवू लागल्या. स्त्री माजघरातून बाहेर पडू लागली, नोकरी व्यवसाय करू लागली. नीलम माणगावे यांच्या कादंबरीतील कविता, विमलाबाई, डॉ. उत्तम, सुमन देसाई, रेखा या स्त्रिया समाजात धीटपणे वावरताना दिसतात. डॉ. उत्तम सुशिक्षीत आहेत त्या स्वतंत्रपणे आपले विचार मांडताना दिसतात. शोधमधील स्त्रियांना स्वत:चे व्यक्तिमत्व असते. पुरूषांनी सांगितल्याप्रमाणे त्यांनी न वागता स्वत:ला रूचेल, आवडेल असे वागावे असे स्त्रीवादी विचार मांडताना दिसतात. सुमन देसाई व रेखा या विधवा परित्यक्त्या स्त्रीयांसाठी मदत करतात. ऐरावती महिला मंडळाच्या सदस्या सुमन देसाई योगासने, दांडिया, केटरिंग, हळदी-कुंकू, पार्लर, आरोग्य-साधना, अंधश्रध्दा निर्मूलन इ. विविध कार्यक्रम घेताना दिसतात. तसेच गावातील अन्यायाविरूध्द लढतात. विधवा, परित्यक्ता, निराधार स्त्रिया यांच्यासाठी पापड, लोणचे, शेवया, मेतकूट, फराळाचे जिन्नस तयार करणे इ. रोजगार उपलब्ध करून देताना दिसतात.

विमलाबाई, कविता, गुलाबी, शराबी, संध्या या स्त्रिया शोषिक वृत्तीच्या, हळव्या, नैराश्यजन्य भासतात. कविता व विमलाबाईंना आपण कमवत नाही याचं दु:ख आहे. प्रिया तेंडूलकर, गौरी देशपांडे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्रियांप्रमाणे त्या अर्थार्जन करताना दिसत नाहीत. नीलम माणगावे यांनी आपल्या कादंबऱ्यांतून मध्यमवर्गीय पांढरपेशा समाजाबरोबरच

उपेक्षित, दुर्लक्षित व मागास समाजाचे चित्रण केलेले दिसते. वेश्या वस्तीतील मागास समाज, कुष्ठरोग्यांचा उपेक्षित समाज याचे दु:खमय जीवन चित्रित केले आहे. पुरूषधार्जिण समाजव्यवस्था त्यांचा बळी ठरलेली स्त्री त्यांच्या कादंबरीत दिसते. लेखिकेने स्त्रियांच्या दु:ख, व्यथा, वेदनांना वाचा फोडलेली दिसते. एका स्त्री लेखिकेने समस्त स्त्री जीवनाचे चित्रण करण्याच्या निमित्ताने या वेगळ्या, उपेक्षित, दुर्दैवी जीवनप्रवासाचा घेतलेला शोध कोणाही पुरूष लेखकाच्या मर्यादा लक्षात येण्यास भाग पडेल, हेच या कादंबरीचे प्रमुख वैशिष्ट्य आणि वेगळेपण आहे.''[४] असे मत डॉ. जी. पी. माळी मांडतात.

पूर्वीची स्त्री माजघरात वावरणारी, शिक्षणापासून वंचित होती. नंतर स्त्रियांनी शिक्षण घेतले. त्या स्वत:चं अस्तित्व, आत्मभान, व्यक्तीस्वातंत्र्य याविषयी चित्रण करू लागले. त्यानंतरच्या काळातील स्त्री केवळ विचार व चिंतन करून थांबलेली नाही तर ती घराबाहेर नोकरी, व्यवसाय करू लागली. अर्थार्जन करून स्वावलंबी बनली. असे असले तरी तिच्यावरील बंधने शिथिल झाली पण पूर्णपणे नष्ट झालेली दिसत नाहीत. या टप्प्यांमधील स्त्रियांपैकी नीलम माणगावे यांच्या कादंबऱ्यातील स्त्री आत्मभान जागृत असलेली, अस्तित्वाचा भान असलेली, व्यक्तिस्वातंत्र्यासाठी धडपडणारी आहे. प्रसंगी परंपरेला छेद देण्याचे धाडस करणारी दिसते.

तसेच कुष्ठरोग्यांचा मागास समाज, झोपड्या उठवून इमारती बांधणारे बिल्डर, वेश्यावस्तीतील दलाल, गुंड याबरोबरच पुरूषप्रधान समाज झोपड्यांमधील जीवन, भ्रष्टाचार इत्यादीचे चित्रण केलेले दिसते. ''प्रमुख कथाधारेच्या अनुषंगाने ना पुरूष ना स्त्री अशा स्थितीत समाज उपहासाला बळी पडणारे गुरू सारखी माणसं एड्सचा प्रचार गरीबांच्या झोपड्या उध्वस्त करून तिथे टोलेजंग इमारती उभारणारे ठेकेदार, गुंडांची अरेरावी, शहरातील बकाल वस्तीतील काळीज हेलावून टाकणारे भयंकर दरिद्री जीवन या गोष्टींकडे लेखिकेने वाचकांचे लक्ष वेधले आहे.''[५] मृत्युदंडमध्ये जैन समाजाचे चित्रण आलेले दिसते. त्या समाजातील उपवास, व्रत वैकल्ये, णमोकार मंत्र, मैनासुंदरी आख्यान, कांदा लसूण न खाणे इ. संदर्भ आलेले दिसतात.

जागृत झालेली स्त्री परंपरेला छेद देण्याचे धाडस करणारी स्त्री चित्रित केलेली दिसते.

**वाचकांच्या प्रतिक्रिया**

नीलम माणगावे यांना आपल्या लेखनातून वास्तव चित्रण करताना त्यातून आदर्श जगाचे चित्र उमटावे असे वाटत असावे असे जाणवते. त्यांनी कथा, कादंबरी, कविता, आत्मकथन इ. वाङ्मय प्रकार हाताळले आहेत. त्यांनी जे लेखन केले त्यावरील आपल्या प्रतिक्रिया मते, वाचकांनी, लेखकांनी त्यांना पत्राद्वारे त्यांना कळवली आहेत. तसेच मासिकातून, वृत्तपत्रातून केलेली समीक्षणे, परीक्षणे याद्वारे लेखिकेच्या लेखनाची वैशिष्ट्ये अधिक स्पष्ट होताना दिसतात. काहींनी त्यांच्या गुणांबरोबरच त्यांचे दोषदर्शनही केलेले दिसते.

कोणत्याही लेखकाला आपल्या गुणांचे कौतुक व दोषांची ओळख झाल्यास त्यांच्यातील दोष दूर होऊन त्यांच्या लेखनात उत्तरोत्तर प्रगती होत असते. नीलम माणगावे यांच्या शोध कादंबरी विषयी म. द. हातकणंगलेकरांनी त्यांना १९ जुलै २००५ रोजी लिहीलेल्या पत्रात लिहीले आहे, 'तुमचे अलीकडचे लेखन समाधानकारक होत आहे. विषय प्रक्षोभक होत असला तरी तुम्ही सहानुभूतीने मांडला आहे. भाषाही परखड, वास्तवदर्शी आहे. मात्र मध्यंतरीच्या शोधाची हकिकत लांबलेली आहे. तो भाग रेंगाळतो. ते निवेदन संक्षेपाने केले असते तर कादंबरीची बांधणी नेटकी झाली असती. अशा प्रकारच्या प्रतिक्रिया दिलेल्या आहेत.'

डॉ. सौ. प्रभा मगदूम आपल्या अभिप्रायात लिहीतात, 'लिहीण्याची शैली साधी असूनही हृदयाला जाऊन भिडते अशी. तुझे मनोमन कौतुक.' नीलम माणगावे यांची भाषा साधी सोपी असली तरी घटना, प्रसंग जिवंत करताना दिसते. वाचकांना मनाला जाऊन भिडते.

नीलम माणगावे सभ्यतेचे भान राखून लेखन करताना दिसतात. त्यांच्या लेखनाबद्दल शांतीलाल भंडारी लिहीतात, ''आम्ही दिवसभर ढुंगणातून पाणी पडुसपतर राबतोय, पण आमची किंमत नाही की आम्हाला भीत नाही असं म्हणून केलेली खंत व विषाद या पार्श्वभूमीवर या लेखनात सापेक्षतेने आणि तुलनेने सभ्यतेचं भान सुटलेलं वाटत नाही व ताळतंत्र सुटला आहे असं जाणवत नाही.''[६]

शोध एका हरवलेल्या वेश्येचा ! या आपल्या समिक्षणात डॉ. शैलजा यादवाड लिहितात, ''समाजाचा एक दुखरा भाग बनून आणि हे रस्त्यावरच्या एकाही पावलाला जाणवत नाही ही आहे. वेश्येच्या जीवनाची भयानक वास्तविकता एक वेगळा विषय घेऊन लेखिकेने त्या विषयाला आपल्याकडून न्याय देण्याचा भरकस प्रयत्न केलेला आहे..... वेश्येंच्या पुनर्वसनासाठी अथवा त्यांच्यासाठी काय करणे शक्य आहे हे सूचित केले आहे. एका नव्या दृष्टिकोनातून या विषयाकडे पाहण्याचा हा स्तुत्य उपक्रम आहे. विचाराला चालना देणारी ही कादंबरी एकदा जरूर वाचण्यासारखी आहे.''[७] तसेच शोध मध्ये कविताला वेश्या वस्तीत जावे लागते तेव्हा तिथल्या आंबट शौकिनांच्या नजरेस सामोरे जावे लागते. चांगली व वाईट दोन्ही प्रवृत्तीच्या माणसांना तोंड द्यावे लागते. याविषयी लिहीताना प्रभा आरडीकर म्हणतात, या प्रवासात आलेले अनेक बरे-वाईट अनुभव, भेटलेली सुष्टदुष्ट माणसे वेश्यांचे वेदनामय, हलाखीचे जीवन, त्याला जबाबदार असलेली पुरूषप्रधान धार्जीणी समाजव्यवस्था या साऱ्याबद्दल प्रसंगवशात, विचारमंथन लेखिकेच्या लेखनात उमटलेले जाणवत राहते. दुसरीकडे स्वत:च्या तथाकथित, सुरक्षित, पण मर्यादशील बंदिस्त समाजाच्या रुढी, नियमांनी बद्ध अशा स्वत:च्या जगण्याची झाडाझडती घेण्यास ती कचरत नाही. एड्स या भयावह व्याधी बद्दलही भाष्य आहे. अशा मर्यादा सोडल्या तर एक माणूस म्हणून जगू इच्छिणाऱ्या सामान्य गृहीणींचा हा प्रवास व शोध निश्चितच दखल घेण्यासारखा आहे.

अशाप्रकारच्या अभिप्राय प्रतिक्रियांमधून नीलम माणगांवे यांच्या लेखनाबद्दलची वैशिष्ट्ये, त्यांचे गुणदोष लक्षात येतात.

नीलम माणगावे या स्त्रीवादी दृष्टिकोनातून लेखन करणाऱ्या सजग लेखिका आहेत. आपल्या लेखनातून त्यांनी सामाजिक प्रश्नांना विशेषत: स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडलेली दिसते. विधवा, प्रौढकुमारींचे प्रश्न, विवाहित स्त्रीचे दु:ख, अपंग स्त्रीचे दु:ख, मुल न होणाऱ्या स्त्रियांची व्यथा इ. चे चित्रण त्यांच्या लेखनात होताना दिसते.

नीलम माणगावे यांची निवेदनशैली, भाषाशैली, प्रसंग वर्णन करण्याची रीत प्रभावी असल्याची दिसते. साधी, सोपी भाषा, म्हणींचा वापर, योग्य तेथे प्रतिमांचा वापर करून आशय परिणामकारक केल्याचे दिसते. असे असले तरी त्यांच्या लेखनाच्या काही मर्यादा जाणवतात. सावंतवाडीच्या उषा परब लिहीतात, "लेखिकेची भाषा साधी, सरळ आहे. मैत्रिणीचा शोध उत्सुकता वाढवतो. पण पुढे त्या दोघींच्या भेटी आणि संवाद हा वेश्येंच्या विदारक जगण्याचा विचारपूर्वक माहिती कथन करण्यासाठीच घडवले जात आहे हे जाणवते त्यामुळे त्यातील सहजता आणि उगवते पण कधी कधी हरवल्यासारखे वाटते. वेश्येचे दु:खद जगण्याचे वर्णन विस्ताराने पुन:पुन्हा होत राहते."[८] माणगावे यांना वेश्यांचे दु:ख मांडावयाचे असल्याने कविता जेंव्हा गुलाबीला भेटते तेंव्हा ती आपल्याला कोणकोणत्या संकटांना सामोरे जावे लागले हे सांगताना पुनरावृत्ती होताना दिसते. त्यामुळे उषा परब यांचे म्हणणे योग्य वाटते.

नीलम माणगावे यांनी आपल्या कादंबऱ्यातून विविध विषय मांडले असले तरी त्यांना कलात्मकतेची उंची गाठता आलेली नाही. त्यांच्या लेखनात प्रिया तेंडूलकर, सानिया, आशा बगे, कविता महाजन इ. लेखिकांप्रमाणे विचारांची प्रगल्भता दिसत नाही. प्रभा हर्डीकर लिहितात, "एड्स या व्याधीबद्दल भाष्य ही आहे. तथापि एकूण या सर्व अनर्था मागची विचारप्रक्रिया फार उंची व खोली गाठू शकली आहे असे वाटत नाही."[९] मृत्युदंड कादंबरीत कमलाकर ही व्यक्तिरेखा चित्रित करताना मानसशास्त्राचा एक प्राध्यापक असूनही तो आपल्या पत्नीला समजून घेत नाही. तिला शिव्या देतो, मारहाण करतो. आपमतलबी, दुष्ट, विक्षिप्त, तिरसट अशी विशेषणे लावून त्याचे व्यक्तिचित्र रंगवले आहे. पण तो माणूस आहे.

माणूस म्हटल्यावर त्याच्याकडे दुर्गूणाबरोबर सदूगुणही आलेच. पण नीलम माणगावे यांचे याकडे दुर्लक्ष झाल्याचे जाणवते.

शोध कादंबरीतील कविता आपल्या बालपणीच्या मैत्रिणीचा ३०-३५ वर्षांनी शोध घेऊ इच्छिते व आपला संसार दुर्लक्षित करून तिचा शोध घेते. तिला मदत करण्यासाठी जीवाचा आटापिटा करते. ही गोष्ट मनाला पटत नाही. एक व्यक्ती काही दिवसांच्या मैत्रीसाठी एवढे करू शकेल का असा प्रश्न मनात निर्माण होतो.

नीलम माणगावे यांच्या कादंबऱ्यातील घटना जाणीवपूर्वक घडवून आणल्यासाख्या वाटतात. कल्पनारम्यता अधिक जाणवते. स्वतःच्या निवेदनातून, संवादातून त्यांना काहीतरी सांगायचे असते. त्यामुळे त्यांचे लेखन प्रचारकी थाटाचे वाटते. त्यांची पात्रे त्यांच्या म्हणण्यानुसार वागतात. त्यामुळे त्यांच्या कादंबरीत एकसुरीपणा येताना दिसतो. अशा काही मर्यादा सोडल्यातर त्यांचे लेखन उल्लेखनीय असल्याचे दिसते.

**नीलम माणगावे यांचे मराठी कादंबरीतील स्थान**

मराठी साहित्यात हरिभाऊ आपट्यांना सामाजिक कादंबरीकार म्हणून ओळखले जाते. हरिभाऊ नंतर वा. म. जोशी, श्री. व्य. केतकर, मामा वरेरकर, फडके, माडखोलकर इ. कादंबरीकारांनी कादंबरीचा विकास घडवून आणण्याचे प्रयत्न केलेले दिसतात. पुरूष कादंबरीकारांप्रमाणे स्त्री लेखिकांनीही मराठी कादंबरीत मोलाची भर घातल्याचे दिसते. काशीबाई कानेटकरांनी रंगराव कादंबरीतून स्त्री शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादन केलेली दिसते. विभावरी शिरूरकरांनी 'बळी' कादंबरीत मांग-गारूडी समाजाने सोसलेल्या दुःखाचे, त्यांच्यातील ओंगळपणाचे, पशुपातळीवरील जीवनचित्रण प्रभावीपणे केलेले दिसते. हिंदोळ्यावर, शबरी इ. कादंबऱ्या लिहिलेल्या आहेत. ''स्त्री मनाच्या विविध धाग्यांचे बंडखोर चित्र कलात्मक पद्धतीने करून कादंबरीला वेगळे वळण लावले ते विभावरी शिरूरकरांनी.''[१०] स्त्री जीवनातील समस्यांचे चित्रण करणाऱ्या, स्त्री मनाचे दुःख प्रभावीरितीने मांडणाऱ्या विभावरी शिरूरकर सजग लेखिका आहेत.

गीता साने यांनी आपल्या कादंबरीतून स्त्री स्वातंत्र्याशी निगडीत असलेल्या वेगवेगळ्या समस्या आपल्या कादंबऱ्यांतून हाताळलेल्या आहेत. निखळलेली हिरकणी, वठलेली वृक्ष इ.कादंबऱ्यांतून कौटुंबिक संबंध, स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्याचा पती-पत्नी संबंधावर होणारा परिणाम, आर्थिक स्वातंत्र्यावर होणारा परिणाम, आर्थिक स्थितीचा संतती संख्येशी असलेला संबंध इ. कितीतरी समस्या हाताळलेल्या आहेत. त्यांच्या कादंबऱ्याविषयी कुसुमावती देशपांडे लिहीतात, ''स्त्री स्वातंत्र्याशी निगडीत असलेल्या वेगवेगळ्या प्रश्नांच्या विचारातून त्यांची कथासरीता उगम पावते व राजकीय विचारप्रणालींची वळणे घेऊन ती आज समाजजीवनाच्या आर्थिक विश्लेषणापर्यंत पोहोचलेली आहे.''[११] (कुसुमावती देशपांडे- मराठी कादंबरी: पहिले शतक (१८५०-१९५०) मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई पृ. १००)

ज्योत्स्ना देवधर यांच्या घरगंगेच्या काठी, कल्याणी इ. कादंबऱ्यांतून परिस्थितीशी झगडणारी स्त्री दिसते. कादंबऱ्यांतून कुटुंबातील संघर्ष चित्रित झाल्याचे दिसते. गौरी देशपांडे यांनी आपल्या कादंबरीतील स्त्री ही समाजात धीटपणे वावरताना दिसते. बंडखोर विचार प्रकट करताना दिसते. ''गौरी देशपांडेच्या कादंबरीतील स्त्री मुक्त, धीट, बंडखोर आहे.''[१२]

इंदिराबाई सहस्त्रबुध्दे यांनी बाळूताई धडा घे, गोदावरी या कादंबऱ्यातून बालविवाह निषेध व विधवा विवाहाची आवश्यकता, विवाहसंस्था इ. विषयीचे विचार व्यक्त केलेले आहेत. स्त्रीला माणूस म्हणून जगता आले पाहिजे. पुरूषांप्रमाणे तिलाही भावना, विकासबुद्धी, स्वतंत्र विचार आहे. तिलाही स्वातंत्र्य मिळाले पाहिजे असे विचार मांडले आहेत.

सानिया यांनी स्थलांतर, आवर्तन या कादंबऱ्यात स्त्री पात्रे केंद्रस्थानी असतात. त्यांच्या मनाची घुसमट, कुचंबणा याचे चित्रण करतात. निराश न होता पुन्हा उभारी घेण्याचा प्रयत्न करताना दिसतात. काळानुसार, विचारानुसार बदललेली जीवनप्रणाली स्विकारत त्यांची पात्रे जगतात. ''सानियांची लेखनशैली काहीशी त्रोटक, संदीग्ध आहे. या शैलीमुळे वेगळ्या व विशिष्ट जीवनदृष्टीमुळे तरल, काव्यात्मक अशा भाषेमुळे यांच्या लेखनाला वेगळेपण लाभलेले आहे.''[१३]

शांता गोखले यांच्या रीटा वेलीणकर या कादंबरीतून वास्तवनिष्ठ आविष्कार झालेला दिसतो. ''आधुनिक जीवनपध्दतीने व्यक्त झालेले पेच मांडण्याचा ते प्रयत्न करतात.... परंतु त्यांच्या लेखनाला ज्या मर्यादा पडतात त्या आपल्या सामाजिक स्थितीचा परिपाक आहे असे म्हणावेसे वाटते.''[१४] नीलम माणगावे यांनी डायरी ही कादंबरी १९९७ साली प्रसिध्द झाली. त्यांनी एकूण पाच कादंबऱ्या लिहील्या. त्यातील ही पहिली कादंबरी आहे. डायरी ही ग्रामीण कादंबरी असून मूल नसलेल्या स्त्रीचे दु:ख त्यात चित्रित झालेले आहे. जिद्द (१९९८) ही कौटुंबिक कादंबरी आहे. या कादंबरीत एका अपंग स्त्रीची कहाणी सांगितली आहे. अपंग असूनसुध्दा ती आपले जीवन जिद्दीने, स्वावलंबनाने, स्वाभिमान जागृत ठेवून जगताना दिसते. 'सोन्या' (१९९९) या कादंबरीत बालगुन्हेगारीचे प्रभावी चित्रण आलेले दिसते. शोध (२००५) ही सामाजिक कादंबरी असून वेश्यांचा प्रश्न त्यांनी पोटतिडकीने मांडलेला आहे. मृत्युदंड (२००६) या सामाजिक कादंबरीतून विवाहित स्त्रीचे दु:ख, वेदना, पुरूषप्रधान संस्कृती, त्याबरोबर कुष्ठरोग्यांचे प्रश्न, समस्या मांडलेल्या दिसतात.

नीलम माणगावे यांनी आपल्या कादंबऱ्यातून कोणत्या तरी समस्या मांडलेले दिसते. त्याबरोबरच स्त्रियांचे प्रश्न, दु:ख, पुरूषप्रधान संस्कृतिमुळे स्त्रियांची होणारी कुचंबना यांचे चित्रण आढळते. लेखिका संधी मिळेल तेथे स्त्रीवादी विचार मांडताना दिसतात. शोध कादंबरीतील वेश्या जीवनचित्रण करताना त्यांचे चिंतन लेखिकेने केलेले आहे पण ते सखोल झाले नसल्याचे जाणवते. लेखिकेला वाचकांना सतत काहीतरी सांगायचे असते. या मोहामुळे त्यांच्या कादंबऱ्यांना काहीसे प्रचारात्मक रूप येताना दिसते. या ठिकाणी उषा परब लिहीतात, ''स्वत:चे विचार मांडण्याचा मोह काही ठिकाणी आग्रहाने आल्याने थोडा प्रचारात्मक आवेष जाणवतो.... पण एक स्त्री म्हणून स्त्री जीवनाबद्दलची तिच्या सुख, दु:ख, वेदना, संवेदनाबद्दलची लेखिकेची खरी तळमळ हेही त्यामागचे कारण असू शकेल.''[१५] माणगावे यांच्या कादंबऱ्या काहीशा बोधवादी, प्रचारात्मक वाटतात. त्यांच्या कादंबऱ्यातील भाषाशैली ओघवती आहे. पण काही वेळेला उपदेश करण्याच्या मोहाने त्याला बाधा येते.

नीलम माणगावे यांच्या कादंबरीचे कथानक उत्कंठावर्धक, योग्य तो परिणाम साधणारे आहे. शेवट कथानकाला पोषक असा झालेला दिसतो. मानवी भावभावना, आई-मुलगा, सासू-सून, बहीण-भाऊ, असे नातेसंबंध उलगडून दाखवण्यात त्यांना यश आलेले दिसते.

''कथा लेखनाच्या एका कार्यशाळेत ज्येष्ठ समीक्षक प्रा. म. द. हातकणंगलेकर यांनी नीलम माणगावे यांच्या कथेवर बोलताना या लेखिकेच्या संभाव्यतेचा विचार करता हिचा भविष्यकाळ उज्वल दिसतो. अशा काहीशा आशयाचे जे उद्‌गार काढले होते त्याची पदचिन्हे त्यांच्या लेखनात उमटलेली दिसतात.''[१६] (तारका मे /जून/जुलै २००६ पृ. क्र. ५७) प्रा. म. द. हातकणंगलेकरांचे त्यांच्याविषयीचे हे उद्‌गार खरे वाटतात कारण उत्तरोत्तर त्यांच्या लेखनात प्रगती झालेली दिसून येते. साक्षीदार, शांते तू जिंकलीस, ज्वालाग्राहाच्या तोंडावर इ. कथासंग्रहासारख्या लेखनातून ते दिसून येते.

नीलम माणगावे यांना आपल्या कादंबऱ्यातून वाचकांचे केवळ मनोरंजन करावयाचे नाही तर त्यांच्या मनावर काही संस्कार करावयाचे आहे, बोध द्यावयाचा आहे असे वाटत राहते. म्हणूनच त्यांच्या लेखनात प्रेमप्रकरणे, प्रेमाचा त्रिकोण, शृंगारीक वर्णने यांचे अवशेष सापडत नाहीत. त्यांच्या शोध कादंबरीतील वेश्या जीवनचित्रण करताना अश्लीलता आढळत नाही. त्यांचे लेखन सामाजिक जाणिवेतून झालेले दिसते. नयना आचार्य, कुसूम अभ्यंकर, योगिनी जोगळेकर, इ. लेखिकांप्रमाणे प्रेमाचा त्रिकोण आणि प्रणयचित्रणात त्या गुरफटताना दिसत नाहीत.

**पुरूषप्रधान संस्कृती**

भारतामध्ये पुरूषप्रधान संस्कृती आहे. विसाव्या शतकात तर स्त्री अर्थार्जन करू लागली. स्वावलंबी झाली. असे असले तरी स्त्री नवऱ्याच्या दडपणाखालीच वावरताना दिसते. प्रथम घर सांभाळण्याचीच फक्त जबाबदारी होती आता घराबरोबर इतरही जबाबदाऱ्या तिला पेलाव्या लागताना दिसतात. नीलम माणगावे यांच्या कादंबरीतील पारंपरिक पध्दतीचे जीवन जगताना दिसतात. त्यामुळे त्या स्त्रियांना पुरूषप्रधानतेची झळ अधिक सोसावी लागते.

शोध व मृत्युदंड या कादंबऱ्यातून पुरूषप्रधान संस्कृतीचे दर्शन घडताना दिसते. शोध मधील गुलाबीचा बाप, तिच्या आईला रोज दारू पिऊन शिव्या देतो, मारहाण करतो. कुटुंबाचा सर्व भार पेलत असूनही स्वत: दिवसभर कष्ट करून सर्वांचे पोट भरण्याची जबाबदारी पेलूनही ज्याचा आपल्याला काडीचाही उपयोग नाही अशा नवऱ्याचा तिला मार खावा लागतो. समाजात अशा प्रकारचे जीवन जगणाऱ्या कितीतरी स्त्रिया आपल्याला दिसतात. मृत्युदंड मध्येदेखील विमलाबाईच्या भांडीवालीच अशीच अवस्था दिसते.

सुशिक्षित, सधन कुटुंबात राहणारी कविता देखील आपल्या नवऱ्याच्या विरोधात जात नाही. तिच्या आवडीचे कोणतेही काम असले तरी नवऱ्याला आवडत असेल तरच तिने ते केले पाहिजे. अन्यथा नाही अशी मानसिकता कविताची त्याचबरोबर तिच्या नवऱ्याचीही झालेली आहे. मृत्युदंडमधील विमलाबाईंना तर त्यांच्या नवऱ्याने गुलामाप्रमाणे वागवलेले दिसते. कमलाकरांच्या इच्छेप्रमाणेच त्यांनी वागले पाहिजे असा त्यांचा आग्रह असतो. सर्व घरातील व्यक्तींवरदेखील ते आपलेच म्हणणे ऐकण्याचा अट्टाहास करताना दिसतात. अशावेळेस त्यांना आपल्या बायकोच्या मनाचा, भावनांचा, जरादेखील विचार नाही. विमलाबाईंचे संपूर्ण आयुष्य त्यांच्या वर्चस्वाखाली गेलेले दिसते. संध्यालादेखील सुरेश व कमलाकरांच्या दडपणाखाली दिवस घालवावे लागतात.

कुटुंबात, समाजात स्त्रियांना नेहमीच दुय्यम स्थान दिले गेलेले आहे. शोध मध्ये कविताला तिच्या नवऱ्याची अरेरावी सहन करावी लागते तर मृत्युदंडमध्ये विमलाबाई व संध्याला कमलाकर, सुरेश दुय्यम स्थान देताना दिसतात. त्यांच्या मताला किंमत देत नाहीत. नीलम माणगावे यांनी शोध व मृत्युदंड मधून पुरुषप्रधान संस्कृतीचे दर्शन घडते. पुरूषधार्जिण्या समाजव्यवस्थेमुळे स्त्रीची होणारी कुचंबना, ससेहोलपट चित्रीत केलेली दिसते.

**स्त्रियांचे शोषण**

फार पूर्वीपासून भारतीय समाजात स्त्रियांचे शारीरिक, मानसिक शोषण होताना दिसते. नीलम माणगावे यांच्या शोधमधील गुलाबीला तिच्या आईने बालपणी अवघ्या शंभर रूपयांसाठी विकले. मावशीने तिला वेश्याव्यवसाय करायला भाग पाडले. निराधार झालेली

गुलाबी लहानपणापासून मावशीजवळ वाढली. ती मोठी झाल्यावर तिचा शरीरविक्रय करून मावशीने पैसा कमावला. दयानंदने लग्न केले पण तिच्या घरातल्या लोकांनी तिला घरातून हाकलून दिले. असहाय्य गुलाबी एकटी बघून पुरूष तिला त्रास देतात. तिच्या अंगाशी झटू पाहतात. रस्त्याकडेला ती बेशुध्द अवस्थेत पडलेली असताना तिच्या शरीराशी चाळा करू पाहतात. त्यातच पोलीस तिच्यावर बलात्कार करतो. गुलाबी व शराबीचे पदोपदी शोषण होताना दिसते. गुलाबी व तिची मुलगी शराबी दोघींनाही देहविक्रय करून पोट भरतानासुध्दा समाज त्यांना जगू देत नाही. कमवलेल्या पैशातून त्यांना पोलीस हप्ता, गुंड, दलाल, इ. ना वाटत बसावा लागतो. त्यांना पोटभर अन्नही मिळत नाही.

मृत्युदंडमधील विमलाबाई विवाहित असूनही त्यांचे शोषण होताना दिसते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य संसारासाठी दिले. आयुष्यभर त्या संसारासाठी कष्ट करत राहतात. जेव्हा त्या वेगळं राहण्याचा विचार मांडतात तेव्हा कमलाकर त्यांना अंगावरील साडीवर घरातून जायला सांगतात. घरावरील हक्क सपल्याचे सांगतात. चाळीस वर्ष आपण संसार केला त्याचे फळ काय? असा विचार त्यांच्या मनात येतो. संसार करणारी वेश्या व विवाहित स्त्री संसार करून तिचीही अवस्था एकसारखीच दिसते. अपमान, अवहेलना उपहास दोघींनाही सहन करावा लागतो.

भारतामध्ये विमलाबाई, गुलाबीसारख्या कितीतरी स्त्रियांचे शोषण होताना दिसते. नीलम माणगावे यांनी शोध व मृत्युदंड कादंबऱ्यांतून स्त्रियांचे शोषण कसे होते याचे परिणामकारक चित्रण केलेले दिसते.

**माणुसकीचा ऱ्हास**

आजच्या संगणक युगात विज्ञानाची प्रगती झाली. आधुनिकीकरणामुळे मानवाला विविध सुखसोयी उपलब्ध झाल्या. पण माया, जिव्हाळा, आपुलकी कमी होऊन माणुसकी नामशेष होतना दिसते.

नीलम माणगावे यांनी शोध मधील वेश्यांचे जीवनचित्रण करताना त्यांच्या बकालवस्तीबद्दल भाष्य करतात. अशा झोपडपट्टीत राहणाऱ्या वेश्यांना त्यांची पर्यायी

व्यवस्था त्यांना हाकलून देऊन त्याजागी टोलेजंग इमारती बांधतात. त्या कोठे जातील, कोठे राहतील याचा विचार कोणीही करत नाही.

ज्याच्यावर संरक्षणाची जबाबदारीच तोच पोलीस असहाय्य गुलाबीवर बलात्कार करतो. शराबीवरदेखील असाच प्रसंग ओढवलेला दिसतो. शाळेचा हेडमास्तरच तिच्यावर बलात्कार करतो. शराबी व गुलाबीबरोबर झालेले बलात्कार माणुसकीला काळिमा फासणारे कृत्य आहे.

गुलाबी सुखी संसाराची स्वप्ने पाहत दयानंदबरोबर त्याच्या घरी जाते. तिच्या सासूला ती वेश्या आहे हे समजल्यावर तिच्याबद्दल सहानुभूती दाखविण्याऐवजी दयानंद घरात नसताना तिला घरातून हाकलून देते. यासाठी ती आपल्या नवऱ्याची, मुलाची मदत घेते. एवढ्या रात्री ती कोठे जाईल याचा विचार करत नाही. ती गरोदर आहे हे ऐकून तिच्या हृदयाला पाझर फुटत नाही.

मृत्युदंडमधील विमलाबाईंना कुष्ठरोग झाल्याचे समजताच मैनासुंदरी आख्यानातील मैनासुंदरीच्या नवऱ्याला झालेला कुष्ठरोग व तिने केलेल्या त्याची सेवा लक्षपूर्वक ऐकणारे आणि हळहळणारे लोक त्यांना वाळीत टाकतात. त्यांच्याशी अस्पृश्यासारखे वागतात.

शोधमध्ये आजारी पडलेल्या गुलाबी व शराबीला जराही विचार न करता त्यांचे सर्व सामान बाहेर काढून गुंडदादा त्यांना खोली रिकामी करायला सांगतो. त्या दोघी राहण्यासाठी कळवळीने विनवणी करतात पण तो ऐकत नाही. शेवटी त्या दोघी विष घेऊन आत्महत्या करताना दिसतात. गुंडदादाचे हे वागणे माणुसकी नष्ट करणारे आहे.

विमलाबाई, दिलीप, कविता यासारख्या व्यक्ती उपेक्षित, दुर्बल घटकांना शक्य होईल तेवढी मदत करताना दिसतात. त्यांची सुख-दु:ख वाटून घेताना दिसताता. त्यामुळे काही चांगल्या माणसांमुळे माणुसकी टिकून आहे. बहुतेक लोक हे स्वार्थी जीवन जगतात. संकटात असहाय्य स्त्रीला मदत करण्याऐवजी तिचा फायदा घेताना दिसतात. म्हणून माणुसकीला काळीमा  फासणाऱ्या घटना समाजात घडताना दिसतात.

**वेश्यांना व गृहिणींना दिली जाणारी वागणूक**

नीलम माणगावे यांच्या शोध कादंबरीतील गुलाबी व शराबी या वेश्यांचे जीवन अत्यंत कष्टमय, खडतर आहे. गुलाबीला आपले लग्न होऊन मुलबाळ व्हावे अशी इच्छा असते. तिचे दयानंदबरोबर लग्नही होते. पण तिचा संसार होत नाही. तिला आपल्या मुलीचे शराबीचे तरी लग्न व्हावे असे वाटते पण तेही शक्य होत नाही. समाज त्यांना स्विकारत नाही. वेश्यांशी लग्न करणे हे अप्रतिष्ठीतपणाचे समजले जाते.

सभ्य, सुसंस्कृत, पांढरपेशा कुटुंबातील व्यक्ती त्यांच्याशी बोलत नाहीत. समाजात वेश्यांना खूप खालच्या दर्जाचे स्थान दिले जाते. वेश्यांकडे कोणत्याही जातीचे, प्रांतांचे, धर्माचे पुरूष येतात पैसे देतात त्यांच्या शरीराचा उपभोग घेतात. त्यांच्याकडून होणाऱ्या मुलांना मात्र आपले नाव देत नाहीत. त्यांच्यासाठी ती एक उपभोगाची वस्तू असते. तिने सामान्य स्त्रीप्रमाणे जगण्याचा प्रयत्न केला तरी समाज त्यांना तसे जगू देत नाही. त्या समाजात कोठेही गेल्या तरी त्या वेश्या आहेत म्हणून त्यांच्याकडे केवळ उपभोग घेण्याच्या मानसिकतेतून पुरूष त्यांच्याकडे पाहताना दिसतात. या अनुषंगाने गुलाबी व शराबीवर बलात्कार झालेला दिसतो.

शोध मधील कविता ही गृहिणी आहे. ती जेव्हा वेश्या वस्तीत जाऊन गुलाबीला मदत करू पाहते तेव्हा तिला तेथील आंबटशौकीनांच्या नजरेला सामोरे जावे लागते. ती वेश्या वस्तीत का आली त्याचा उलटसुलट अर्थ लावला जातो. गुलाबीला आपला संसार झाला असता तर आपण सुखी झालो असतो असे वाटते तेंव्हा कविता म्हणते, ''तुम्ही बायका पोटासाठी गिऱ्हाईक जपत असता. आम्ही आमच्यासारख्या संसारी बायका आम्ही वेगळं काय करतो? नवरा नावाचं गिऱ्हाईकच जपत असतो की?... हे सगळ गुलाबीला माहीत नव्हतं. तिच्या मते संसारी बाई म्हणजे फार सुखी नवरासुध्दा बलात्कार करत असतो. संसारी बाईला अनेक पुरूषांशी संबध ठेवावा लागत नाही. आणि वेश्या बायकांना कुठल्याही पुरूषांची अरेरावी सहन करावी लागत नाही.''[१७] अशा स्त्रीविषयीच्या चिंतनातून नीलम

माणगावे स्त्रीला समाजात केवळ दुय्यम समजून वागवले जाते मग ती विवाहीत असो वा वेश्या तिच्या मनाचा विचार केला जात नाही असे दिसते.

मृत्युदंडमधील विमलाबाई, संध्या या गृहिणीच आहेत. या दोघींनाही दुय्यम स्थान आहे. त्यांनी घरातील सर्वांचे सर्वकाही विशेषत: नवऱ्याचे सर्व काही ऐकले पाहिजे. त्यांना हवे नको ते बघितले पाहिजे अशी सर्वांची मानसिकता असते. विमलाबाई जेव्हा गृहीणीपद बाजूला ठेवून स्वतंत्र राहू इच्छितात तेव्हा समाज त्यांना नावे ठेवायला लागतो. नवऱ्याला, मुलाबाळाला, सोडून स्वतंत्र कशा राहतात? याबद्दल उलटसुलट चर्चा करताना दिसतो. स्त्रीच्या मन, भावना, इच्छा, आकांक्षाचा समाज विचार करताना दिसत नाही. परंपरेला छेद देणाऱ्या गोष्टी तो पचवू शकत नाही असे दिसते.

**स्त्रियांच्या समस्या**

स्त्रिया हा समाजातील एक महत्त्वाचा घटक आहे. समाजाचा निम्मा भाग स्त्रियांनी व्यापलेला आहे. स्त्री व कुटुंब यांचा अत्यंत घनिष्ट संबंध आहे. मुलांना जन्म देणे, त्यांचे संगोपन करणे याची फार मोठी जबाबदारी स्त्रियांवर आलेली दिसते. त्यामुळे जीवनात कौटुंबिक, आर्थिक, सामजिक, धार्मिक निर्माण होताना दिसतात.

**कौटुंबिक समस्या**

शोधमधील कविता ही छोट्या कुटुंबात राहते. घरातील नवरा, मुलं यांचे जेवण, चहा, नाश्ता अशा बारीक सारीक गोष्टींकडे जाणीवपूर्वक लक्ष देते. पण जेव्हा ती वेश्यांना मदत करण्यासाठी धावते तेव्हा ते काम तुझे आहे म्हणून तिला त करावे लागते. यामुळे कुटुंबात वाद होतात.

मृत्युदंडमधील विमलाबाईंना आपल्या नवऱ्याचेच म्हणणे ऐकत रहावे लागते. त्यांच्या शिव्या, मार खावा लागतो. त्या गृहिणी असल्यामुळे त्यांना पूर्णपणे आपल्या नवऱ्यावर अवलंबून राहावे लागते. आयुष्यभर संसार करून तिचा घरावरील कोणत्याही वस्तूवर कोणताही अधिकार नाही. असे तेव्हा विवाहित स्त्री विवाह संस्थेत सुरक्षित आहे का? असा प्रश्न उपस्थित होतो.

**आर्थिक समस्या**

शोधमध्ये गुलाबी व शराबी देहविक्रय करून पैसे कमवितात. पण त्यातील गुंड, मवाली, दलाल, पोलीस इ. चे हप्ते, खोली भाडे यालाच खर्च होतात. त्यांच्या पोटाला अन्नही मिळणे कठीण होऊन जाते.

शोधमधील कविता व मृत्युदंडमधील विमलाबाई दोघीही गृहिणी आहेत. त्या मिळवत्या नसल्याने त्यांना पैशासाठी पूर्णपणे आपल्या नवऱ्यावर विसंबून रहावे लागते. छोट्या छोट्या कामासाठी त्यांना त्यांच्याकडे पैसे मागावे लागतात. पैसे कशाला हवेत? आधी दिलेले पैसे कसे संपले? यासारख्या प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतात. कविताला वेश्यांना मदत करायची असते. विमलाबाईंना कुष्ठरोग्यांना मदत करायची असते तेंव्हा त्यांना आर्थिक समस्या निर्माण होताना दिसतात. आजकाल स्त्रिया अर्थार्जन करताना दिसतात. पण त्यांना ते पैसे खर्च करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असते का. विमलाबाई व कविता यांना जेव्हा आर्थिक प्रश्न पडतो तेंव्हा त्यांना आपले स्त्रीधन आठवते. पण त्यावरही त्यांचा पूर्णपणे अधिकार असत नाही.

**सामाजिक समस्या**

समाजाने पुरूषांपेक्षा स्त्रियांना अधिक बंधने, मर्यादा घालून दिलेल्या आहेत. शोधमधील कविता वेश्यावस्तीत जाते हे पाहून तिच्या नवऱ्याचा मित्र तसेच वेश्यांविषयी चौकशी करताना पोलीस तिच्याशी सभ्यता सोडून बोलतात. गुलाबीसारख्या असहाय्य स्त्रीचा समाजातील पुरूष फायदा घेताना दिसतात. मृत्युदंडमधील विमलाबाई कुष्ठरोग्याच्या वसाहतीत जाऊन कार्य करू पाहतात तेव्हा कमलाकर व सुरेश त्यांना विरोध करतात. कुष्ठरोग्यांची समस्या ही एक सामाजिक समस्या आहे. ती सोडवण्यामध्ये विमलाबाई आपला खारीचा वाटा उचलतात.

शोध कादंबरीत बिल्डर, भ्रष्टाचार, पोलीस, हेडमास्तर यांनी केलेले बलात्कार या घटना समाजव्यवस्थेबद्दल विचार करायला लावणाऱ्या आहेत. गुलाबीच्या आईने सात मुलींना जन्म दिला. आपल्याला मुलगा हवा. मुलगा म्हणजे वंशाचा दिवा या अंधश्रध्देपोटी

सात मुलींना जन्म देणारी गुलाबीची आई नंतर त्यांचे पोट भरता येत नाही म्हणून गुलाबीला शंभर रूपयांना विकताना दिसते. लोकसंख्या वाढीतून अशा इतरही समस्या निर्माण होताना दिसतात.

**धार्मिक समस्या**

पुरूषांपेक्षा स्त्री उपवास, व्रतवैकल्ये अधिक करताना दिसते. धार्मिकतेचा पगडा तिच्यावर अधिक असतो. स्त्रीला मासिक पाळी येणे हा शरीरधर्म आहे पण लोकांनी त्याचा धार्मिकतेशी संबंध जोडलेला असल्याने त्याचा त्रास त्यांना होताना दिसतो. घरातील एखाद्या धार्मिक कार्याच्या वेळी स्त्रीया मासिक पाळी पुढे ढकलण्याच्या गोळ्या घेतात आणि स्वत:च्या शरीराची नासधूस करून घेतात. मृत्युदंडमधील डॉ. उत्तमला याची जाणीव असल्याने हे ती आपल्या सासूला समजून सांगते. पण नसानसात भिनलेल्या धार्मिकतेचे संस्कार तिची सासू सोडू शकत नाही. म्हणून वाद होताना दिसतात.

नीलम माणगावे यांनी शोध व मृत्युदंड कादंबरीतून स्त्रियांना दिले जाणारे स्थान, त्यांचे प्रश्न, कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक, धार्मिक समस्या मांडलेल्या दिसतात.

**समारोप**

प्रस्तुत प्रकरणात नीलम माणगावे यांच्या शोध व मृत्युदंड या कादंबऱ्यांच्या अनुषंगाने त्यांच्या सामाजिक व वाङ्मयीन वैशिष्ट्यांचा विचार केलेला आहे. स्त्रीवादी दृष्टीकोनातून लेखन करणाऱ्या माणगावे यांनी आपल्या लेखनात स्त्रीला केंद्रस्थानी ठेवून त्यांच्या वेदना, व्यथा यांना वाचा फोडल्या. शोध मध्ये वेश्यांचे जीवनचित्रण करताना कविता या गृहिणीचेही दु:ख मांडलेले दिसते. मृत्युदंडमधील पुरूषप्रधान संस्कृतीचा बळी ठरलेल्या विमलाबाईचा आक्रोश, वेदना, सोशिकता याचे चित्रण झालेले दिसते.

नीलम माणगावे यांना पत्राद्वारे कळवलेले अभिप्राय त्यांच्या लेखनावरील अनुकूल-प्रतिकूल प्रतिक्रिया, वृत्तपत्रातून प्रसिध्द झालेले समीक्षणे, परीक्षणे यांचाही अभ्यास करून त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये अभ्यासली आहेत.

# संदर्भ-सूची


१. अदवंत, म. ना. :'हरिभाऊ विविधदर्शन,' दा. ना. मोघे प्रकाशन, हरिभाऊ पूर्वकालीन मराठी कादंबरी स्वरूप, सामर्थ्य आणि मर्यादा, पृ. क्र. ४४.

२. डॉ. सोमण, अंजली :'साहित्य आणि सामाजिक संदर्भ,' प्रतिभा प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९८९, पृ. क्र. ९०.

३. डॉ. ठाकूर, रवींद्र : 'मराठी कादंबरी समाजशास्त्रीय समालोचन, दिलीपराज प्रकाशन, पृ. क्रं. २१३.

४. डॉ. माळी, जी.पी. :'वेली आणि फुले,' अक्षरदीप प्रकाशन, कोल्हापूर. प्र. आ. २००७, पृ. क्र. २४.

५. परब, उषा :'शोध' वेश्या जीवनाचे दारूण वेदनेचे जिवंत चित्रण,' आरती मासिक, श्री. सी. उपाध्ये (संपा.) पृ. क्र. ३१.

६. भंडारी, शांतीलाल : 'तारका' त्रैमासिक मे/जून/जुलै २००६, पृ. क्र. ५३.

७. डॉ. यादवाड, शैलेजा :'शोध'एका हरवलेल्या वेश्येचा! रविवार दि. २ एप्रिल २००६.

८. परब, उषा :'शोध'वेश्या जीवनाचे दारूण वेदनेचे जिवंत चित्रण,' आरती मासिक, सी. श्री. उपाध्ये (संपा.) पृ. क्र. ३२.

९. हर्डीकर, प्रभा : आपल्या वाचनालयात (सदर).

१०. प्रा. डॉ. बिरासदार, वसंत : 'आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास,' कैलास पब्लिकेशन्स, औरंगपुरा, औरंगाबाद, पृ. क्र. २१३.

११. देशपांडे, कुसूमावती : 'मराठी कादंबरी : पहिले शतक (१८५० ते १९५०),' मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई, पृ. १००.

१२. 'स्त्री साहित्याचा मागोवा,' खंड दुसरा पृ. क्र. १७८.

१३. 'संक्षिप्त मराठी वाङ्मयकोश,' १९२० पासून २००३ पर्यंतचा कालखंड, प्रभा गणोरकर, उषा ठकळकर, वसंत आबाजी डहाके, दयानंद भटकर (संपा.)

१४. 'खोले, विलास : 'गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी,' लोकवाङ्मयीन गृह, मुंबई, २००२, पृ. क्र. १४०.

१५. परब, उषा : 'शोध वेश्या जीवनाच्या वेदनेचे दारूण चित्रण,' आरती मासिक, श्री. सी. उपाध्ये (संपा.), पृ. क्र. ३२.

१६. भंडारी, शांतिलाल : 'जसं घडलं तसं 'कळीनं सांगितलं,' तारका त्रैमासिक, मे/जून/जुलै २००६, पृ. क्र. ५३.

१७. माणगावे, निलम : 'शोध,' सुकृत प्रकाशन, सांगली, प्र. आ. २००५, पृ. क्र. १५९.